IMPACT FACTOR : 3.2661

ISSN-2348-2702

Peer Reviewed

# APOORV KNOWLEDGE

## International Journal of Multidisciplinary Research

December-2020 Vol. VIII Issue - IV



Impact Factor : 3.2661, ISSN -2348-2702, Vol. - VIII, Issue - IV, December 2020

# APOORV KNOWLEDGE

## International Journal of Multidisciplinary Research-

## Peer Reviewed

December - 2020 Vol. - VIII Issue - IV

• EDITOR-IN-CHIEF •

**Dr. Vandana Namdeo Bankar**

Head of Home Science Dept.,
Dhareshwar Shikshan Sanstha's,
Arts and Science College, Chincholi (Li.)
Tq. Kannad, Dist. Aurangabad, (M.S.) India.
**BOS Member in Home science**
Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University,
Aurangabad

---

• PUBLISHED BY •

**Bharat Sarjerao Jamdhade**
**Aurangabad**

# INDEX


| Sr. No. | Topic | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Challenges of Learning in Home Economics: A study of College students of Home Economics | - Dr. Sandhya A. Kale | 7 |
| 2 | Influence of Gender and Emotional maturity on High School Students. | - Rukmini S.<br>Prof. Ramaswamy | 16 |
| 3 | Farmer Producer Organisations: A Concept paper | - Dr. Raksha | 20 |
| 4 | Role of Women in Agriculture Sector | - Sapna Yadav | 25 |
| 5 | Women's Clothing In Maharashtra Emerging From Marathi folk songs By Women | - Dr. Sangita Meshram<br>Mrs. Ranjana Meshram | 29 |
| 6 | Mahasweta Devi : The Writer Par Excellence | - Dr. Priyanka Priyadarshini | 33 |
| 7 | लोकगीतों की दुनिया | - डॉ. प्राची हलगांवकर | 36 |
| 8 | आर्थिक सुधारणांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामांचे अध्ययन | - प्रा.डॉ. वायसे शामराव भगवान | 40 |
| 9 | लोकप्रतिनिधींच्या कामाचा त्यांच्या कौटूंबिक कर्तव्यावर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास | - डॉ. जीवनज्योति निकाळजे (म्हस्के) | 45 |
| 10 | नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यातील हमाल- मापाडी कामगारांच्या कर्जाचा व व्यसनाधीनतेचा समाजशास्त्रीय अभ्यास | - प्रा. डॉ. मधुकर आत्माराम देसले | 49 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांचा किशोरवयीन मुलांच्या शारीरिक, सामाजिक विकासावर होणारा परिणाम | - प्रा. डॉ. पुनम देशमुख (चौधरी) | 59 |
| 12 | भारतातील नवीन कृषी सुधारणा कायदे आणि शेतकऱ्यांची भूमिका | - डॉ. संजीव शिंदे | 62 |
| 13 | कोरोना काळातील भारतातील दारिद्र्याची स्थिती | - प्रा. डॉ. पांडुरंग सदाशिव डांगे | 66 |
| 14 | आंध आदिवासी जमात परिवर्तनाच्या वाटेवर | - डॉ. ए. आर. वागडव | 70 |
| 15 | केवलीश्वरवादानुसार जगत व ईश्वर संबंध | - डॉ. सुनील काळमेघ | 76 |
| 16 | महिला सबलीकरणात बचतगटाची भूमिका | - डॉ. गंगासागर तुळशीदास चोले | 80 |
| 17 | 'झेलझपाट' कादंबरीतील लोकभाषा | - डॉ.सुलतान पिरू पवार | 83 |
| 18 | लोकसाहित्य : विकास, प्रसार आणि शाश्वतता | - प्रा.डॉ.राजेंद्र आत्माराम पाटील | 88 |
| 19 | सामाजिक सुधारणावादी चळवळीत महात्मा फुले यांचे योगदान | - अर्चना सदाशिव बचुटे<br>विजय महादेव इनकर | 92 |
| 20 | भारतातील आर्थिक सुधारणा व सर्वसमावेशक ग्रामीण विकास | - भारत जमधडे | 96 |
| 21 | अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक : एक दृष्टीक्षेप | - डॉ. विलास वसंतराव पाटील | 100 |

# महिला सबलीकरणात बचतगटाची भूमिका

डॉ. गंगासागर तुळशीदास चोले

• सहा. प्राध्यापिका, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

महिला बचतगट हे महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्थापन झालेले आहे. शिक्षित व अल्पशिक्षित महिलांसाठी लघूउद्योग व गृहउद्योगाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवून त्यांची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी बचत गट ही चळवळ सुरू झाली. बचतगटाच्या माध्यमातून महिलांची आर्थिक स्थिती उंचाव–ण्याबरोबरच महिलांना रोजगार निर्मिती करून इतर महिलांचे सबलीकरण करण्यास बचतगट पूरक ठरले आहेत. बचतगटांच्या माध्यमातून महिलांना सुलभ अर्थपुरवठा केला जात असल्याने महिलांचे आर्थिक सक्षमीकरण घडून येत आहे.

बचतगटातील सदस्य महिला ह्या मनापासून बचतगटात सहभागी होऊन कार्य करत असतात. कोणतेही कार्य करण्यासाठी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाची गरज असते. अशा पद्धतीने कार्य केल्यास उद्दिष्टये साध्य होतील आणि अडचणी येणार नाहीत. बचत गटाच्या सदस्य ह्या बचतगटाचा मुळ पाया असतो. त्यांच्यावरच महिला–बचतगटाचे यश अवलंबून असते. बचत गट योग्य पद्धतीने चालवत असल्यामुळे महिलांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडत असलेले दिसून येत आहे. आजची महिला ही स्वतंत्र कार्य करून स्वावलंबी बनत चाललेली आहे. महिलांच्या अंगी असणारा समजूतदारपणा, प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, कार्यक्षमता, निटनेटकेपणा, काटकसर आणि प्रसंगी कठोरता या वैशिष्टयांचा फायदा बचतगट स्थपना व बचतगट चालविण्यास होत आहे. दारिद्र्य कमी करण्यासाठी व महिलांचा आर्थिक सहभाग वाढविण्यासाठी शासनाने बचत गटाला चालना दिली आहे. आणि त्याचाच परिणाम असा कि, आज गावोगाव बचतगट स्थापन झालेले आहेत. कधीही घराबाहेर न पडणाऱ्या स्त्रिया आज बचतगटाच्या माध्यमातून नेतृत्व करत असतांना दिसतात. बचतगटाच्या माध्यमातून स्त्रिया संघटित होतात. एकत्र येतात आणि समाजात होणाऱ्या वाईट प्रथांनाही नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**उद्दिष्ट्ये :**

1. बचतगटामुळे महिलांचा आर्थिक दर्जा वाढला आहे का हे जाणून घेणे.
2. बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण झाले आहे का हे जाणून घेणे.
3. बचतगटामुळे महिला स्वावलंबी बनल्या का हे जाणून घेणे.

**गृहितकृत्य :**

1. बचतगटामुळे महिला आर्थिक स्वावलंबी झाल्या आहेत.
2. महिलांमध्ये नेतृत्व विकास झाला आहे.
3. आर्थिक दृष्टया महिला सक्षम झाल्या नाहीत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्यसंकलनाच्या साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

**महिला बचतगट :**

गरिबीतील गरीब व्यक्तीसुद्धा त्याला योग्य ते मार्गदर्शन केल्यानंतर उद्योजक होवू शकतो. हे प्रा. युनूस यांनी शोनार बांगला या बँकेच्या माध्यमातुन जगाला दाखविले आहे. भारतात बचतगट विकासासाठी वित्तीय संस्थांबरोबरच काही बिगर शासकीय संस्थां–चाही महत्वाचा भाग आहे. दक्षिण भागात सधन फाऊंडेशन सेवा तर महाराष्ट्रात अन्नपूर्णा ग्रामीण महिला व बालविकास केंद्र, चैतन्य संस्था यांचे कार्य प्रशंसनीय आहे. सरकारने शेतकरी स्वयंसहायता बचतगट सुरू केलेला आहे. कारण बहुतांश महिला हया शेतकरी आहेत. आज शेती ही भरवशाची राहिलेली नाही आणि त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यामुळे शेतीसाठी आर्थिक सहायता, विकसीत तंत्रज्ञान आणि कर्जपुरवठा अनुदान अशा अनेक विविध योजना राबविल्या जात आहेत. बचतगटामार्फत समुह शेती ही संकल्पना सुद्धा उदयास येत आहे.

**बचतगटाची आवश्यकता :**

1. महिलांचा कुटुंबातील दर्जा वाढविणे.
2. महिलांचे आर्थिक, सामाजिक, मानसिक सबलीकरण करणे.
3. महिलांना बँकेचे व्यवहार माहिती करणे.
4. बचतगटामार्फत महिलांना संघटित करून त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे.
5. महिलांना स्वावलंबी बनवणे.
6. महिलांना एकमेकांसोबत चर्चा करण्यासाठी बचतगट आवश्यक आहे.
7. महिलांच्या विचारांची व अनुभवांची देवाण–घेवाण करण्यासाठी बचतगटाची आवश्य–कता आहे.

**बचतगटाची वैशिष्टये :**

1. बचतगट हे कोठेही नोंदविण्याची किंवा पास करण्याची आवश्यकता नाही. नाबार्डच्या परिपत्रकाप्रमाणे केवळ बचत गटाच्या सदस्यांच्या ठरावाने त्या गटाचे बँकेत खाते काढता येऊ शकते.
2. बचत गट काढतांना कसलाही खर्च येत नाही.
3. महिला बचतगटामार्फत सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जामुळे सभासद सामाजिक व आर्थिक विकासात परिणाम होऊन महिला सक्षम बनले.
4. बचतगटांना बँकेकडून कर्ज मिळावे यासाठी 1998 पासून केंद्रिय अर्थसंक–ल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.
5. बचतगटामुळे सर्व बाबतीत समानता साधर्म्य असणारे एकत्र येतात. ही समानता वय, व्यवसाय, वस्ती, लिंग, भाषा इ. बाबत असते.
6. गटातील सर्व सभासदांच्या गरजा समान असतात. अशा व्यक्ती या गटात असतात.
7. बचतगटातील सर्व व्यवहार रोखीने केले जातात. त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता येते.

**बचतगटाचे फायदे :**

1. महिला वेगवेगळे व्यवसाय सुरू करू शकतात.
2. व्यवसायामधून पैसे कमवण्याची संधी मिळते.
3. बचतगटामुळे महिला संघटित होतात.
4. बचतगटामुळे बचत व काटकसरीची सवय लागते.
5. तातडीच्या गरजा भागविण्यासाठी कोणाकडूनही कर्ज घेण्याची गरज भासत नाही.

6. बचतगटामुळे त्वरित व सुलभरित्या कर्जपुरवठा होतो.
7. सदस्यांना बँकेचे व्यवहार माहिती होतात.
8. कमी व्याजदरात आर्थिक सहाय्य उपलब्ध होते.
9. गटातील सदस्यामध्ये परस्पर सहकार्य, विश्वास निर्माण होतो.
10. सभासदांना अंतर्गत कर्जपुरवठा अल्प व्याजदराने होतो.
11. महिला स्वावलंबी होतात.
12. महिलांना आर्थिक व्यवहाराची माहिती होते.
13. बचतगटामुळे सदस्यांचे समाजात स्थान निर्माण होते.
14. सरकारी लोककल्याणाच्या विविध योजनांची माहिती होते.

अशा प्रकारे बचतगटाचे अनेक फायदे आहेत.

**बचतगटाच्या माध्यमाने महिलांचे सबलीकरण :**

स्त्रियांच्या कामाचा दर्जा, परिस्थिती हया गोष्टी हीन दर्जाच्या मानल्या जात होत्या. महिलांच्या कामाला केंद्रीभूत मानून त्यांच्या कामाचा व त्यागाचा विचार केल्यास सबलीकरणास सुरूवात होईल. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, धाडस, निर्णय क्षमता निर्माण होईल. महिला सबलीकरणाचे विविध पैलु असले तरी स्वयं सहाय्यता समूह हा आर्थिक पैलू फार महत्वाचा आहे. स्वयंसहाय्यता गटाच्यामार्फत धाडसाने उद्योग सुरू करू शकतात. कारण भांडवल उभारणी, विक्री व्यवस्था, प्रशिक्षण, यंत्रसामुग्री कच्चामाल, कर्जफेड इ. गोष्टींचे मार्गदर्शन बचतगटामार्फत केले जाते. त्यामुळे महिलांची कार्यक्षमता, व्यवस्थापन कौशल्य, निर्णयक्षमता, रोजगार निर्मितीत वाढ इत्यादी गोष्टींमुळे महिलांचे सबलीकरण होते. महिलांमधील अंगभुत असणाऱ्या क्षमतांना आकार देणारे काम बचतगट करत आहेत.

**निष्कर्ष :**

1. समाजामध्ये सक्षम होणाऱ्या महिलांची संख्या कमी आहे.
2. महिलांचा आर्थिक सहभाग भारतात कमी आहे.
3. बरेच बचतगट अशाप्रकारचे आहेत की, त्या बचतगटाच्या बैठका नियमित होत नाहीत.
4. बचतगटामुळे महिलांना उद्योगधंद्याचे महत्व कळाले आहे.
5. महिला बचतगटामध्ये मजूरी व घरकाम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे.
6. आजसुद्धा महिलांना बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

ग्रामीण भागात महिलांना कौटुंबिक विचार करूनच बचतगटात गुंतवणूक करावी लागते.

संदर्भ

1. महिला बचतगट आणि ग्रामीण विकास–प्रा.डॉ.व्ही.एस. मंगनाळे, प्रा. शिवाजी जगताप (मुक्तरंग प्रकाशन)
2. योजना मासिकाचे विविध अंक
3. कुलकर्णीवंदना, महिलांचा आर्थिक सक्षमीकरणाकडे वाटचाल.
4. डॉ. गोरे–गव्हाणे शुभांगी, "महिला सबलीकरण स्वरूप व समस्या", वरद पब्लिकेशन, औरंगाबाद.
5. इंटरनेट

International Journal of Multidisciplinary Research

# APOORV KNOWLEDGE

**Book Post**

To, ..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

Printed, Published and Owned by Bharat Sarjerao Jamdhade, Printed at Rudrayani Offset, 70/D, Service Industries Area, CIDCO, Aurangabad, Dist. Aurangabad. (M.S.) and Published from F-40/5, Ayodhya Nagar, N-7, CIDCO, Aurangabad, Dist. Aurangabad. (M.S.) Editor : Vandana Namdeo Bankar
Mob.: 8177803216, 9049591747 R.N.I. No. : MAHMUL/2013/54029.
**e-mail :** apoorvjamdhade@rediffmail.com

**Price : ₹ 250/-**